भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानूमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदूर्ग

## कालावधी (दिनांक २९.०१.२०२० ते ०२.०२.२०२०)

अंक ८/२०२० | दिनांक २८.०१.२०२० | कालावधी ५ दिवस

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२२/०१/२०२० ते २८/०१/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पूढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानूमान (वैधता २९/०१/२०२० ते ०२/०२/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२/०१ | २३/०१ | २४/०१ | २५/०१ | २६/०१ | २७/०१ | २८/०१ | दिनांक | २९/०१ | ३०/०१ | ३१/०१ | ०१/०२ | ०२/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३६.० | ३७.० | ३७.० | ३७.० | ३७.० | ३५.५ | ३४.० | कमाल तापमान (अं. से) | २९ | ३० | २९ | ३१ | ३२ |
| १८.५ | १६.५ | १६.५ | १७.० | १७.० | १७.० | १९.० | किमान तापमान (अं. से) | १७ | १७ | १६ | १८ | १९ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ - मेघाच्छादन (ऑक्टा.) | १ | ० | ० | २ | ४ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | दुपार - मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९० | ८८ | ८९ | ९१ | ८५ | ८५ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८६ | ७२ | ६६ | ७६ | ६७ |
| ३७ | ३४ | ३४ | ३४ | ३३ | ५५ | ४८ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५४ | ४३ | २८ | ३५ | २३ |
| १.३ | १.५ | १.४ | १.४ | १.२ | १.३ | १.४ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००६ | ०१० | ००८ | ००७ | ००४ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ - वा-याची दिशा | ईशान्ये कडून | आग्नेय कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून |
| ईशान्य | ईशान्य | दक्षिण | दक्षिण | ईशान्य | पश्चिम | पश्चिम | दुपार - वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या आठवड्यात हवामान थंडीबरोबर ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वायंगणी भात | फुटवे | या आठवड्यात ढगाळ वातावरणाचा अंदाज वर्तविण्यात आलेला असल्यामुळे भातावर पाने गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव आढळल्यास नियंत्रणासाठी २५% प्रवाही क्विनॉलफॉस २ लिटर किंवा ट्रायझोफॉस ४०% प्रवाही ६२५ मिली किंवा लॅमडासायहॅलोथ्रिन ५% प्रवाही २५० मिली प्रति ५०० लिटर पाण्यामध्ये मिसळुन एक हेक्टर क्षेत्रावरती फवारावे. |
| कुळीथ व चवळी | फुलोरा ते शेंगा | या आठवड्यात ढगाळ वातावरणाचा अंदाज वर्तविण्यात आलेला असल्यामूळे चवळी, कुळीथ इ. पीकांवर मावा व पाने पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी १५ मि.ली. डायमिथोएट प्रती १० लीटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| कडवा वाल | फुलोरा ते शेंगा | वाल पिकास पिकाच्या वाढीच्या सर्व अवस्थांमध्ये जमिनीमध्ये ओलावा असणे आवश्यक आहे. पिकाला फुलो-यात असताना आणि दाणे भरण्याच्या काळात पाण्याच्या २ पाळ्या द्याव्यात. ज्यादा पाण्यामुळे वालाची शाखिय वाढ होते व उत्पन्न घटते.<br>पिक फुलो-यात आल्यावर शेंगा पोखरणा-या अळीच्या नियंत्रणासाठी मॅलॅथिऑन २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| भुईमुग | शाखिय वाढ | भुईमुगाचे पीक एक महिन्याचे होऊन त्यास फुले येण्यास सुरुवात झाली असल्यास त्यात निंदणी करुन भर देण्याचे काम हाती घेण्यात यावे. त्यासाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या “स्वस्तीक” या भरणी अवजाराचा वापर करावा. |
| आंबा | फुलोरा | विद्यापीठाच्या शिफारशीनुसार मोहोरलेल्या झाडांना फळगळ कमी होऊन चांगली फळधारणा होण्यासाठी आम्रशक्ती या विद्राव्य अन्नद्रव्याची १ लि. प्रती १९ लि. पाणी या प्रमाणात फवारणी करावी. सदर २५ लि द्रावण हे चार मोहोरलेल्या झाडांसाठी वापरावे.<br>जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी येणा-या मोहोरावर फुलकीडीचा (थ्रिप्स) प्रादुर्भाव आढळुन आल्यास अशा ठिकाणी फुलकिडींच्या नियंत्रणासाठी ४५ % स्पीनोसॅड २.५ मिलि प्रति १० लिटर पाण्यातुन संपुर्ण झाडावर फवारावे.<br>या आठवड्यात ढगाळ वातावरणाचा अंदाज वर्तविण्यात आलेला आहे. जिल्ह्यामध्ये काही ठीकाणी आंबा पीकामध्ये मोहोर बाहेर आलेला आहे. अशा ठिकाणी आवश्यकता असल्याक तुडतुड्यांच्या व भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी १७.८% इमिडाक्लोप्रीड ३ मिली किंवा ५०% कार्बारिल पा.मि.भु. २० ग्रॅम किंवा ५०% क्लोथियानिडीन १.२ ग्रॅम + हेक्झाकोनॅझोल ५ मिली किंवा कार्बेन्डेझिम १० ग्रॅम किंवा ग्रॅम किंवा ८०% पाण्यात मिसळणारे गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन संपुर्ण झाडावर फवारावे. ईमिडाक्लोप्रीड या किटकणाशकाची फवारणी आंबा हंगामात फक्त एकदाच करावी.<br>काही ठीकाणी मोहोर पुर्णपणे उमलुन आलेला आहे व मोहोरी व वाटाणा आकाराची फलधारणा सुरु झालेली आहे. अशा ठीकाणी आवश्यकता असल्यास तुडतुड्यांच्या व भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी चोथी फवारणी घ्यावी. त्यासाठी २५% थायोमेथोक्झाम पाण्यात मिसळणारे दाणेदार किटकनाशक १ ग्रॅम + ५% हेक्झाकोनॅझोल ५ मिली किंवा ५०% कार्बेन्डेझिम १० ग्रॅम किंवा ८०% पाण्यात मिसळणारे गंधक २० ग्रम प्रती १० लिटर पाण्यात मिसळुन संपुर्ण झाडावर फवारावे. |
| काजु | फळधारणा | काजुवरील बोंड व बी पोखरणा-या अळींच्या नियंत्रणासाठी डायक्लोरोव्हॉस ७६% प्रवाही १० मिलि प्रती १० लिटर पाण्यातुन फवारावे. |
| मिरची | फुलोरा ते फळधारणा | मिरचीवर बोकड्या किंवा चुरडा मुरडा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास रोग नियंत्रणासाठी व रोगकारक किडींच्या उदा. फुलकिडे व पाढरी माशींच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर १५ दिवसांनी फोरेट १० कि./हे. द्यावे तसेच डायमिथोएट ३०% प्रवाही १ मिली + गंधक २ ग्रम किंवा मॅन्कोझेब २ ग्रम प्रती लिटर पाण्यात मिसळुन पुर्नलागवडीनंतर १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. |
| दुभती जनावरे, शेळ्या, कुक्कुटपालन | - | रात्रीच्या वेळी किमान तापमानात घट होत असल्याने जनावरांचे थंडीपासुन योग्य ते संरक्षण करण्यासाठी रात्रीच्या वेळी जनावरांना गोणपाटाचे पांघरुन घालावे तसेच रात्रीच्या वेळी कोंबड्याचे थंड वा-यापासुन संरक्षण करण्यासाठी शेडला बाहेरुन पडदे लावावेत. तसेच पिल्लांना प्रेशी ऊष्णता देण्यासाठी विद्युत दिव्यांची व्यवस्था करावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
नोडल ओफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)